
Dr. B. R. Katurwar
Degloor

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal


An International Multidisciplinary
Quarterly Research Journal



# AJNATA

Volume-VIII, Issue-I
January - March - 2019
Marathi Part - III

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com




Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded

Ajanta Prakashan

DEGLOOR COLLEGE DEGLOOR
ADAT VYAPARI ED
* Dist.Nanded *

VOLUME - VIII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# CONTENTS OF MARATHI PART - III


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | दैनंदिन जीवनात प्राणायामाचे फायदे<br>**प्रा. डॉ. दिलीप दत्तात्रयराव भडके** | १-४ |
| २ | भ्रष्टाचार : भारतीय लोकशाही व प्रशासनापुढील एक आव्हान<br>**प्रा. डॉ. बि. आर. खत्तुरवार** | ५-११ |
| ३ | भारतीय संविधानातील महिला कल्याण विषयक तरतुदी<br>**प्रा. डॉ. पुरणशेट्टीवार व्ही. एन. (पुदरोड)** | १२-१४ |
| ४ | लोकशाहीचे भवितव्य : एक दृष्टिक्षेप<br>**प्रा. संजय मोहाड** | १५-१८ |
| ५ | भारतीय लोकशाहीपुढील आव्हाने<br>**गजभारे सुरेश बळीराम** | १९-२४ |
| ६ | भारतीय लोकशाहीपुढील आव्हाने<br>**प्रा. बालाजी गंगाराम गायकवाड** | २५-३० |
| ७ | छत्रपती संभाजी महाराजांच्या लोकशाहीप्रणित स्वराज्यापुढील आव्हाने<br>**प्रा. काठेवाडे पुंडलिक एम.** | ३१-३४ |
| ८ | पंडित जवाहरलाल नेहरुंचे लोकशाही विषयक विचार<br>**प्रा. नामदेव तुकाराम मोरे** | ३५-३८ |
| ९ | भारतीय लोकशाही समोरील आव्हानांचा आढावा<br>**प्रा. डॉ. पी. डी. सूर्यवंशी** | ३९-४३ |
| १० | स्त्रीशिक्षणातील अडथळे<br>**Shri. Bhagwat D. Gore**<br>**Shri. Vitthal M. Lodhe** | ४४-४९ |
| ११ | भारतीय लोकशाहीचे यश आणि अपयश एक अभ्यास<br>**प्रा. डॉ. पी. के. एकंबेकर** | ५०-५२ |
| १२ | लोकशाही सक्षमीकरणात ग्रंथालयाची भुमिका<br>**डॉ. श्रीमती आवचार सविता सदाशिव** | ५३-५६ |
| १३ | लोकशाही सक्षमीकरणात ग्रंथालयाची भुमिका<br>**डॉ. श्रीमती आवचार सविता सदाशिव** | ५७-६० |
| १४ | भारतीय लोकशाही समोरील आव्हाने<br>**प्रा. डॉ. सकनुरे एस. एल.** | ६१-६५ |

VOLUME - VIII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2019
**AJANTA - ISSN 2277 - 5730 -IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)**

# २. भ्रष्टाचार : भारतीय लोकशाही व प्रशासनापुढील एक आव्हान

प्रा. डॉ. बि. आर. कत्तुरवार
लोकप्रशासन विभाग प्रमुख, देगलूर महाविद्यालय, देगलूर.

लोककल्याणाची विविध कार्य पार पाडण्यासाठी शासन संस्थेला प्रशासनातील अधिकारी कर्मचारी वर्गाला अधिकार प्रदान करावे लागतात. पुर्वीच्या शासन व प्रशासनाला केवळ पोलिसी स्वरुपाची कार्य करावी लागत होती. आज लोककल्याणकारी कार्य, विकासात्मक कार्य, संरक्षणात्मक कार्य पार पाडावी लागतात. प्रशासनाचे कार्यक्षेत्र व्यापक बनले आहे. त्यामुळे शासन व प्रशासकीय अधिकारी - कर्मचाऱ्यांच्या भूमिकेला विशेष महत्व प्राप्त झाले आहे. देशाच्या सर्वांगीण विकासासाठी प्रामाणिक, कार्यक्षम व नैतिक मुल्यांचे पालन करणारा अधिकारी वर्ग आवश्यक असतो. पण दुर्देवाने आज असा वर्ग दिसून येत नाही. प्रशासनाच्या सर्वच स्तरावर भ्रष्टाचार आढळून येतो.

अर्थात भ्रष्टाचार ही केवळ आधुनिक काळात निर्माण झालेली समस्या नाही. प्राचीन व मध्ययुगीन काळातही भ्रष्टाचाराने समाज जीवन ग्रासलेले होते. अशी अनेक ऐतिहासिक ग्रंथात आढळते. पहिले प्रशासकीय विचारवंत व अर्थशास्त्रज्ञ कौटिल्यांनी आपल्या जगप्रसिध्द अर्थशास्त्र या ग्रंथात भ्रष्टाचाराबाबत सविस्तर मांडणी केली आहे. कौटिल्याच्या मते, ज्याप्रमाणे एखाद्या व्यक्तिच्या जिभेवर पडलेलया मधाची चव चाखणे सहज शक्य आहे त्याप्रमाणे महसूल गोळा करणारे अधिकारी सार्वजनिक वित्ताचा काही प्रमाणात उपभोग घेणे सहज शक्य आहे.

भ्रष्टाचार ही समस्या केवळ भारतापुरतीच मर्यादित नाही तर जगातील सर्व देशात कमी-अधिक प्रमाणात ही समस्या दिसून येते. इ.स. १८८२ पर्यंत अमेरिकेत अधिकारी कर्मचाऱ्यांची लूट पध्दतीने केली जाणारी भरती, हे देखील तेथील भ्रष्टाचाराचेच उदाहरण होय. पूर्वीच्या काळी नागरिक अधिकाऱ्याला नजराणे, भेट देऊन आपली कामे करवून घेत होते. स्वातंत्र्यानंतर अधिकारी वर्गाला त्यांच्याक ामाच्या मोबदल्यात मासिक वेतन देण्यात येऊ लागले. वाढत्या गरजांच्या तुलनेत वेतन अपूरे पडू लागल्यामुळे व तीव्रतेने होणाऱ्या नितीमूल्यांच्या ऱ्हासामुळे भ्रष्टाचार वाढत आहे.

वर्तमान परिस्थितीत तर भ्रष्टाचार हा शिष्टाचार बनला आहे. प्रशासनातील अधिकाऱ्यांची जाऊ तिथे खाऊ ही मनोवृत्ती बनली आहे. राज्यकर्ते व अधिकारी आपले कर्तव्य विसरत आहेत. गैरमार्गाचा अवलंब करुन स्वार्थ साधत आहेत. खा, प्या व मजा करा. (Eat, Drink & be merry) ही भोगवादी प्रवृत्ती वाढत आहे.

शासन व प्रशासनातील व्यक्ती जसजशी मोठया पदावर जाऊ लागले, तसतशा तिच्या गरजा वाढत आहेत. राहणीमान उंचावत आहे, सामाजिक प्रतिष्ठा वाढत आहे, पण त्या नुसार गरजाही वाढत आहेत. अशा वाढत्या गरजांची पूर्तता करण्यासाठी व्यक्ती अनैतिक, भ्रष्ट मार्गाचा अवलंब करु लागतो. त्यातूनच शोषण, काळाबाजार, पिळवणूक, सार्वजनिक पैश्याची उधळपट्टी, फसवणूक इत्यादी गैरकृत्य वाढत आहेत.

DEGLOOR COLLEGE DEGLOOR Dist. Nanded

भ्रष्टाचार हा समाज जीवनाला लागलेला कॅन्सर आहे आणि तो वेगवेगळया स्वरुपात दिसून येतो. प्रशासनातील निविदा प्रकरणातील गैरव्यवहार, विविध घोटाळे, कर्चुकवेपणा, कामचुकारपणा, लाच इत्यादी बाबी सर्वत्रच आढळून येत आहेत. भ्रष्टाचारामुळे भारतीय समाजमनावर अनिष्ठ परिणाम होऊ लागले आहेत. वाढत चाललेल्या भ्रष्टाचाराला वेळीच प्रतिबंध घातला नाही तर संपूर्ण प्रशासन यंत्रणा पोखरुन जाऊन लोकशाही धोक्यात येऊ शकते. म्हणुन भ्रष्टाचार संपुष्टात आणण्यासाठी सर्व स्तरावर प्रयत्न होणे आवश्यक आहे.

**भ्रष्टाचाराचा अर्थ : (Meaning of Corruption)**

जेंव्हा एखादी व्यक्ती मिळालेल्या अधिकाराचा दुरुपयोग करुन वैयक्तिक स्वार्थ साधते, त्या कृतीस भ्रष्टाचार असे म्हणतात. भ्रष्टाचार या शब्दाचा सरळ अर्थ भ्रष्ट आचार असा होतो. भ्रष्ट म्हणजे अनैतिक किंवा अयोग्य आणि आचार म्हणजे वर्तन होय. जो व्यक्ती अनैतिक किंवा अयोग्य वर्तन करतो त्या वर्तनास भ्रष्टाचार म्हणतात.

भारतीय राज्यघटनेतील कलम नं. १६१ मध्ये भ्रष्टाचाराची व्याख्या नमूद केली आहे. जेंव्हा एखादा सार्वजनिक सेवक किंवा सार्वजनिक सेवक होऊ इच्छिणारा आपले सार्वजनिक काम करीत असताना कायदेशीर वेतनाशिवाय एखाद्या व्यक्तिला अनुकूल व प्रतिकूल काम करुन व उपकृत वा अपकृत करुन काम करुन अथवा न करुन त्याबद्दल स्वत:साठी किंवा दुसऱ्यासाठी बक्षिस किंवा सन्मान मिळवतो किंवा मिळविण्याचा प्रयत्न करतो त्यावेळी त्याच्या वर्तनास भ्रष्टाचार म्हणतात.

**Artical १६१**

Whosoever being or expecting to be public servant accepts or obtains or agrees to accept or attempts to obtain from any person for himself or for any other person any gratification whatever other than legal remuneration as a motive of reward for doing or forbearing to do any official act or for showing or to show in the exercise of his official function, favor or disfavor to any person or for rendering or attempting to render any service or disservice to any person, shall be termed as corruption.

सत्तेचा दुरुपयोग करणे, सार्वजनिक पैशाची उधळपट्टी करणे, अपात्र व्यक्तिला नोकरी देणे, कर्तव्यात कसूर करणे ही देखील भ्रष्टाचाराचीच रुपे आहे. राबर्ट ब्रुक यांच्या मते, भ्रष्टाचार म्हणजे अशी कृती होय की, जी सामाजिक परिवर्तन , विवेक व जनइच्छेविरोधी असते. लेखकाच्या मते, नियमबाह्य किंवा बेकायदेशीर वर्तन म्हणजे भ्रष्टाचार होय. संनतानम समितीच्या मते, भ्रष्टाचार म्हणजे स्वार्थासाठी अयोग्य रितीने आपल्या पदाचा केलेला वापर होय.

**भ्रष्टाचाराची कारणे**

केवळ भारतातच नव्हे तर जगातील सर्वच राष्ट्रातील , प्रशासन व्यवस्थेत भ्रष्टाचार कमी-अधिक प्रमाणात होतच असतो. भ्रष्टाचाररुपी जागतिक समस्येने समाज जीवन ग्रासले आहे. शासन व प्रशासन यंत्रणेवरील जनतेचा विश्वास कमी कमी होत आहे. भ्रष्टाचारास प्रामुख्याने खालील बाबी कारणीभूत आहेत.

**१. ऐतिहासिक वारसा**

प्राचीन ऐतिहासिक ग्रंथांचा अभ्यास केल्यास भ्रष्टाचाराचा इतिहास मानवी समाजच्या उत्पत्तीपासुन असलेला दिसून येते. कौटील्याने प्राचीन भारतात भ्रष्टाचार कसा केल्या जात होता ? कसा उघडकीस आणला जात होता ? आणि भ्रष्टाचारी व्यक्तिस कोणकोणती शिक्षा दिली जात होती. याचे सविस्तर वर्णन अर्थशास्त्र या ग्रंथात केले आहे. प्राचीन भारतात राज्यांच्या विविध खात्यात भ्रष्टाचार कमी अधिक प्रमाणात होता. तत्कालीन अधिकारी वर्गावर कायदा-नियमांचे बंधन नव्हते म्हणून लोकांकडून भेटी व नजराणे स्वीकारले जात होते. थोडक्यात भ्रष्टाचाराला अनेक वर्षाचा इतिहास आहे.

**२. भोगवादी पाश्चात्य संस्कृतीचा प्रभाव**

आधुनिक काळात वैभवशाली भारतीय संस्कृतीतील नीतीमूल्यांचा मोठया प्रमाणात ऱ्हास होत आहे. चित्रपट, टी.व्ही. विविध प्रसारमाध्यमे आणि धार्मिक क्षेत्रात संधीसाधू लोकांचे वाढलेले प्राबल्य इत्यादी कारणामुळे भोगवादी विचाराला महत्व प्राप्त होत आहे. संपूर्ण जगाला वसुधैव कुटूंबकम चा संदेश देणाऱ्या भारतीय संस्कृतीवर पाश्चिमात्य संस्कृतीचा प्रभाव वाढत आहे. भारतीय समाजाचा एक महत्वाचा घटक असलेले सनदी सेवक पाश्चात्य संस्कृतीच्या प्रभावाला बळी पडत आहेत. खा, प्या व मजा करा (Eat, Drink & be merry) या प्रवृत्तीमुळे काही सनदी सेवक उघडपणे भ्रष्टाचार करीत आहेत.

**३. श्रीमंताचे अनुकरण करण्याची प्रवृत्ती**

समाजात सुखी, समाधानी व वैभसंपन्न जीवन जगणारा श्रीमंत वर्ग संख्येने कमी असतो. याउलट साधारण स्वरुपाचे जीवन जगणाऱ्यांची संख्या प्रचंड असते. सामान्य कुटूंबातील एखादी व्यक्ती जेंव्हा सनदी सेवेत अथवा शासन कारभारात पदार्पण करते. त्यास अधिकार जेंव्हा प्राप्त होतात तेंव्हा लवकर श्रीमंत होण्याची अभिलाषा / महत्वाकांक्षा निर्माण होते. श्रीमंताप्रमाणे आपली जीवनशैली असावी. त्यासाठी सनदी सेवक अधिकाधिक पैसा, संपत्ती कमावण्याच्या मागे लागतो. श्रीमंताची जीवनशैली आपला आदर्श मानून वागण्याचा प्रयत्न करतो. त्यासाठी लागणारा पैसा कायदेशीर पगारातून मिळणे शक्य नसते. परिणामी बेकायदेशीर मार्गाने पैसा कमविण्याची वृत्ती विकसित होते व भ्रष्टाचार वाढतो.

**४. दोषपुर्ण नियम व कार्यपध्दती**

शासनकर्ते जनकल्याणाचा हेतू समोर ठेवून कायदे करीत असले तरी अनेकदा शासकीय परिपत्रकातील भाषा गुंतागुंतीची , द्विअर्थबोध होणारी असते. कार्यालयातील कामकाज पध्दती अतिशय विलंब लावणारी असते.

उदा : एखाद्या विद्यार्थ्यास जातीचे अथवा उत्पन्नाचे प्रमाणपत्र काढावयाचे झाल्यास अनेक संदर्भीय दाखले जोडून अर्ज सादर करावा लागतो. संबंधित आधिकाऱ्यांने त्या दाखल्यांची सत्यता पडताळून चोकशी करुन संबंधितास प्रमाणपत्र देणे अपेक्षित असते. ही प्रक्रिया पुर्ण होण्यासाठी अनेक दिवस लागण्याची शक्यता असते. संबंधित विद्यार्थ्यास कार्यालयात अनेक चकरा माराव्या लागतात. त्यामुळे वेळ, पैसा,श्रम आणि शैक्षणिक नुकसान होते. वरील नुकसान टाळण्यासाठी लाच देऊन त्वरित प्रमाणपत्र घेण्याचा प्रयत्न विद्यार्थी करतो.

DEGLOOR ADAT VYAPARI EDU. COLLEGE DEGLOOR Dist.Nanded

थोडक्यात प्रशासकीय कामकाजाची पध्दती क्लिष्ट असते. ठराविक नमुन्यात माहिती भरुन द्यावी लागते. ते नमुने सोपे व सरळ नसतात. काही फॉर्म (नमुना) इंग्रजी भाषेत असतात. कार्यालयात एका टेबलावरुन दुसऱ्या टेबलावर फाईल पाठविण्यास खूप विलंब लागतो. या कागदपत्रांच्या प्रवासातील घर्षण कमी व्हावे म्हणून लाच दिली जाते व राज्यकर्ते व अधिकाऱ्यांना भ्रष्टाचार करण्यास संधी मिळते.

**५. जागरुक लोकमताचा अभाव**

साक्षरता अभियानासारखे अनेक उपक्रम राबवून देखील भारतातील निरक्षरतेचे (वास्तविक) प्रमाण चिंताजनक आहे. भारतीय समाजात अंध श्रध्दा अज्ञान, धर्मांधता, जातीयता, रुढी परंपराचा पगडा इत्यादी बाबी आजही प्रकर्षाने दिसून येतात. काही ठिकाणी अशिक्षित नागरीकांपेक्षा सुशिक्षित पकर्षाने दिसून येतात. काही ठिकाणी अशिक्षित नागरिकांपेक्षा सुशिक्षित नागरिकामध्येही जागरुकतेचा अभाव दिसून येतो. प्रत्येकजण पैश्याच्या मागे धावत आहे. मी आणि माझे कुटूंब यापलीकडे विचार करण्यास कोणी धजावत नाही अन्यायाचा प्रतिकार करण्यासाठी नागरिक सुसंघटीत व जागरुक असावे लागतात. नागरिकात सामाजिक बांधीलकीची जाणीव असावी लागते. दुर्देवाने समाजसेवा या पवित्र क्षेत्रालाही व्यवसायाचे स्वरुप येत आहे. सारांश जागरुक लोकमताअभावी भ्रष्टाचार वाढत आहे.

**६. सनदी सेवकांना संरक्षण**

सनदी सेवकांना कायदेशीर संरक्षण असते. शिवाय जोपर्यंत एखाद्या सनदी सेवकाने लाच घेतली ही बाब न्यायालयात सिध्द होत नाही. तोपर्यंत त्यास बडतर्फ केले जात नाही. विशेषत: महिला कर्मचारी व मागासवर्गीय कर्मचाऱ्यांना विविध कायद्याचे संरक्षण असते. अशा अधिकाऱ्याने भ्रष्टाचार केल्यास त्याविरुध्द तक्रारही करण्याचे धाडस सामान्य नागरिक करु इच्छित नाही. अनेकदा कायदेशीर पळवाटांचा शोध घेऊन किंवा न्यायालयात युक्तिवाद करुन राज्यकर्ते व सनदी सेवक भ्रष्टाचार प्रकरणातून सुटत असतात. त्यामुळे भ्रष्टाचार वाढीस खतपाणी मिळते.

**७. राजकीय दबाव**

लोकशाहीत राज्यकर्ते किंवा नेते प्रत्येक खात्याचया सर्वोच्च स्थानी विराजमान असतात. राज्यकर्त्यांच्या आदेशानुसारच सनदी सेवकांना कार्य करावे लागते. राजकीय पुढाऱ्यांना कायद्याचे फारसे बंधन नसते. त्यामुळे हा वर्ग स्वत:च्या इच्छेनुसार अधिकाऱ्यांनी काम करावे, यासाठी दबावतंत्राचा वापर करतात, राजकीय पुढाऱ्यांचा भरती, बदली प्रक्रियेतही हस्तक्षेप होतो. अनेकदा पात्रता नसलेली व्यक्तिही शासन व प्रशासनात निवडली जाते. त्यामुळे अशा व्यक्तिच्या मदतीने बेकायदेशीर कामे केली जातात. राजकीय हस्तक्षेपामुळेच जनसामान्यांसाठी असलेल्या योजनांचा लाभ इतरांना मिळतो.

**८. इतर कारणे**

अ) आधुनिक समाजात व्यक्तिची ओळख त्यांच्या चरित्र्यावरुन, बुध्दिमत्तेवरुन केली जा नाही. तर त्याच्याजवळ असलेल्या संपत्तीवरुन केली जात आहे. त्यामुळे भ्रष्टाचार वाढत आहे.

ब) जोपर्यंत समाजात परिवर्तनवादी चळवळीच्या माध्यमातून सामाजिक सुधारणा घडून येत नाही तोपर्यंत

DEGLOOR COLLEGE ... Dist.Nanded



नागरिक जागरुक होत नाहीत.अलिकडच्या काळात सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीतही संधीसाधू लोकांचे प्राबल्य वाढले आहे. त्यामुळे ही भ्रष्टाचार वाढीस मदत मिळत आहे.

क) सामाजातील उद्योगपती तथा व्यापारी स्वतःच्या जास्त लाभ व्हावा म्हणून विविध खात्यातील अधिकाऱ्यांना लाच देतात आणि शासनाची फसवणूक केली जाते, कर बुडविल्या जात आहे.

ड) गावातील तलाठयाच्या कार्यालयापासून (सज्जा) ते केंद्रीय सचिवालयापर्यंत प्रत्येक कार्यालयात दलाल किंवा एजंटची जमात निर्माण झाली आहे. त्याच्या मदतीशिवाय कोणतेही प्रशासकीय काम पुर्ण हाणे कठीण होत आहे. अधिकारी वर्ग देखील दलालामार्फत लाच घेत आहेत. त्यामुळे भ्रष्टाचार वाढतच चालला आहे.

इ) इमानदार, प्रामाणिक निष्कलंक व शांत स्वभावाच्या व्यक्तिला जीवन जगताना अनेक अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. एखाद्या कार्यालयात अथवा शासन संस्थेत प्रामाणिक व्यक्ती असेल तर त्याचीच थट्टा केली जात आहे.

ई) वाढती महागाई देखील भ्रष्टाचार वाढीस कारणीभुत आहे.

फ) सुखलोलूप जीवनपध्दतीचा हव्यास, वाढती लोकसंख्या, बेरोजगारी, मुल्यांची घसरण, नैतिकता व अध्यात्माकडे होणारे दुर्लक्ष इत्यादी कारणामुळे भ्रष्टाचार होतो.

**भ्रष्टाचार प्रतिबंधात्मक उपाय**

भ्रष्टाचाराचे विस्तारलेले स्वरुप पाहता भ्रष्टाचार समुळ नष्ट करण्यासाठी सर्व पातळीवरुन प्रामाणिक प्रयतन होणे आवश्यक आहे. त्यासाठी खालील यंत्रणा भ्रष्टाचार नियंत्रणासाठी स्थापन करण्यात आली आहे.

**१. केंद्रीय दक्षता आयोग**

**(Central Vigilance Commission)**

शासन व प्रशासनातील अधिकारी वर्गांनी भ्रष्टाचार केल्याची तक्रार दक्षता आयोगास प्राप्त झाल्यास निःपक्षपणे चौकशी केली जाते. या आयोगाच्या अध्यक्षांची नेमणूक राष्ट्रपतीमार्फत केली जाते. भ्रष्टाचार प्रकरणांच्या चौकशीनंतर दोषी लोकप्रतिनिधी व अधिकाऱ्यावर कायदेशीर कार्यवाही करण्यासंबधीच्या शिफारशी केंद्रीय गृहमंत्रालयास सादर केली जाते. त्यांनतर हा अहवाल संसदेत चर्चेसाठी सादर केला जातो. त्यामुळे केंद्रीय दक्षता आयोगाच्या अहवालास भ्रष्टाचार नियंत्रणाच्या कार्यात विशेष महत्व असते.

**२. केंद्रीय गुन्हा अन्वेषण विभाग (C.B.I) (Central Bureau of Investigation)**

भारतातील बेकायदेशीर मार्गाने संपत्ती जमा करणाऱ्या व्यक्तिच्या घरावर छापा घालणे, भ्रष्टाचारा संदर्भात आलेल्या तक्रारीची चौकशी करणे आणि बेहिशोबी मालमत्ता ताब्यात घेणे इत्यादी कामे या विभागामार्फत केली जातात. दोषी व्यक्तीवर भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यानुसार कार्यवाही केली जाते. (C.B.I.) ची स्थापना १९६३ मध्ये करण्यात आली.

VOLUME - VIII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 -IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

### ३. लोकपाल व लोकायुक्त

प्रशासकीय सुधारणा आयोगाच्या शिफारशीनुसार संसदेत अनेकदा लोकपाल विधेयकावर चर्चा झाली. [illegible] अद्यापर्यंत लोकपाल विधेयकास संसदेची अंतिम मान्यता मिळाली परंतु अद्याप लोकपाल या पदावरील नियुक्तीची प्रक्रिया पूर्ण झाली नाही. अर्थात अनेक घटक राज्यात लोकायुक्त या पदाची निर्मिती करण्यात आली आहे. महाराष्ट्रात लोकायुक्त हे पद निर्माण करण्यात आले आहे. लोकायुक्तामार्फत राज्यातील भ्रष्टाचारासंबंधी प्रकरणाची सखोल चौकशी केली जाते व संबंधितावर कार्यवाही करण्याची शिफारस राज्य शासनाला केली जाते.

### ४. इतर उपाय

अ) भ्रष्टाचार नियंत्रणात ठेवण्यासाठी भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलन अधिक प्रभावी होणे आवश्यक आहे. लोकजागृती व लोकशिक्षणाद्वारे हे कार्य पुढे नेणे आवश्यक आहे.

ब) शासनाचे विविध निर्णय, नियम-उपनियम व परिपत्रकातील भाषा सोपी असणे आवश्यक आहे. जनसामान्यांना त्याचा अर्थबोध होईल अशी परिपत्रके निघणे आवश्यक आहे.

क) समाजातील पैशामागे धावण्याच्या प्रवृत्तीला आळा घालणे आवश्यक आहे. कित्येक राजे झाले गेले अंती मुखात माती. हा विचार नेते व सनदी सेवकांना पटवून देणे आवश्यक आहे.

ड) भ्रष्टाचारविरहीत समाज रचना स्थापण्यासाठी राजकीय-प्रशासकीय,सामाजिक व व्यक्तिगत अशा पातळ्यावर प्रयत्न होणे आवश्यक आहे.

इ) भ्रष्टाचार प्रकरणात दोषी आढळणारा व्यक्ति कोणीही असो. त्यास कठोर शिक्षा केली पाहिजे.

ई) भ्रष्टाचारी प्रकरणाची त्वरित चौकशी होणे आणि त्याचा निकाल लावण्यासाठी स्वतंत्र न्यायालयाची स्थापना करणे आवश्यक आहे.

फ) सनदी सेवकांना वाढत्या महागाईनुसार वेतनवाढ, भरपूर सुखसुविधा उपलब्ध करुन देण्यात यावी.

प) शासन व प्रशासनात माहिती व तंत्रज्ञानाचा जास्तीत जास्त वापर करावा.

भ्रष्टाचाराचे समुळ उच्चाटन करणे कठीण असले तरी अशक्य नाही. अर्थात भ्रष्टाचार निर्मुलनाचे कार्य व्याख्याने देऊन लेख लिहुन अथवा प्रशिक्षण देऊन पुर्ण होणार नाही. त्यासाठी आत्मपरीक्षण व कर्तव्यपालन या दोन बाबींवर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. या संदर्भात एका उर्दु लेखकांचे विचार या ठिकाणी नमुद करणे आवश्यक वाटते.

इल्मदां समझते है तकरीरोंसे बदलता है जमाना
सियासतदां कहते है नारोंसे बदलता है जमाना
हाकिमोंने फर्माया हुक्म नामोंसे बदलता है जमाना
कातिबोंने लिखा है कायदोंसे बदलता है जमाना

पर मिजाजेहां बदलनेको यह काफी नही होता |

नसीहत देनेवाला खुद बदला तो बदलता है जमाना |

इल्मदां म्हणजेच शिक्षणतंज्ञ म्हाणतात की, शिक्षणप्रणाली बदलली तर दुनिया (जग) बदलते. सियासतदां म्हणजे राज्यकर्ते म्हणतात. की, घोषणा दिल्यामुळे जग बदलते. हाकिमोंने म्हणजेच अधिकारी म्हणतात की, आदेशांची प्रभावीपणे अंमलबजावणी केल्यास जग बदले. कातिब (कायदेपंडीत) लिहितात की, कायदे बनविल्यामुळे जग बदते. पर मिजातेहां म्हणजेच जनतेचा स्वभाव बदलण्यासाठी या बाबी पुरेशा नाहीत.

नसीहत देनेवाला म्हणजेच उपदेश करणारा स्वत: बदलला, त्याने आपल्या कर्तव्याचे पालन केले तर जग बदलण्यास वेळ लागणार नाही.म्हणून प्रत्येकाने आत्मपरीक्षण करुन कर्तव्याचे पालन करणे आवश्यक आहे. तरच भ्रष्टाचाराचे समुळ उच्चाटन होऊन एक विकसित राष्ट्र म्हणून भारताचा उदय होण्यास वेळ लागणार नाही.

Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded